# मुलांसाठी बाइबल
## प्रस्तुत

# येशू बारा मदतनिसांची निवड करता



लेखक: Edward Hughes
अनुवादक: Rev. Shilas Gavit
रेखाचित्रकार: Byron Unger; Lazarus
रूपान्तरकार: E. Frischbutter; Sarah S.

60 गोष्टींतील 39 (पहिली)

**www.M1914.org**

***Bible for Children,*** *PO Box 3, Winnipeg, MB R3C 2G1 Canada*

परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्टविकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

मराठी

Marathi

येशूने अद्‌भुत गोष्टी केल्या. त्याने आजार बरे केले, अस्वस्थ असलेल्या लोकांच्या हृदयात व मनात त्याने शांती दिली, आणि देवाचे वचन शिकविले.



1

मदतीसाठी आणि रोग बरे व्हावेत म्हणून लोकसमुदाय येशूकडे येत.



2


त्याला देवाचे काम करण्यास मदत करावी यासाठी त्याचे जे पुष्कळ अनुयायी होते त्यांच्यातून बारा जणांची निवड करण्याचे त्याने ठरविले.
3


जेंव्हा तुम्हांला एखादा महत्वाचा निर्णय घ्यायचा आहे, तेंव्हा तुम्ही देवाकडे प्रार्थना करता का? येशूने केली! डोंगरावरील शांत ठिकाणी तो त्याच्या स्वर्गिय पित्याशी बोलला. सूर्य मावळेपर्यंत येशूने प्रार्थना केली.
4


त्या अंधाऱ्या रात्री येशू संपूर्ण रात्रभर प्रार्थना करीत होता.
5


सकाळी, येशूने त्याच्या सर्व अनुयायांना – जे त्याची सेवा करित व त्याच्या आज्ञा पाळीत अशा मित्रांना बोलाविले. त्यांच्यातून त्याने बारा जणांना त्याचे विशेष मदतनिस किंवा प्रेषित बनण्यास निवडून घेतले.
6


सर्वात आधि ज्यांची निवड केली ते दोघे, शिमोन पेत्र व अंद्रिया हे भाऊ होते. जेंव्हा येशूने त्यांना त्याच्या मागे येण्याचे आव्हान केले तेंव्हा त्यांचा मासेमारीचा व्यवसाय सोडून ते येशूच्या मागे गेले.
7


जब्दीचे मुलगे याकोब आणि योहान हे देखिल मासेमारीचे जाळे सोडून येशूच्या मागे गेले.
8

फिलिप्प, बर्थलमय, मत्तय, थोमा, शिमोन जिलोत, अल्फिचा मुलगा याकोब आणि या याकोबाचा भाऊ तद्दय, आणि यहुदा इस्कर्योत ज्याने नंतर येशूला धरुन दिले.



9

येशू जे काही सांगतो त्याप्रमाणे वागणे म्हणजे मजबूत खडकावर घर बांधण्यासारखे आहे, असे येशूने शिकविले. उंचबळून आलेले वादळ त्या घराचा नाश करु शकणार नाही.



10

परंतू येशूच्या सांगण्याप्रमाणे न वागणे हे वाळूवर बांधलेल्या एखाद्या घरासारखे आहे. आणि जेंव्हा वादळ वारा येईल तेंव्हा ते घर पूर्ण पडून जाईल.



11

येशूच्या काही आज्ञा सोप्या नव्हत्या. "जर कोणी तुझ्या उजव्या गालावर मारील तर तु त्याच्यासमोर तुझा डाव गाल देखिल दे" "तुमच्या शत्रूंवर प्रीति करा" अशी येशूची शिकवण होती. येशूच्या शिकवणीप्रमाणे जगण्यासाठी लोकांना देवाची मदत हवी.



12

ज्याप्रकारे काही धर्मपुढारी, लोकांना दाखविण्यासाठी करतात तसे नव्हे तर येशूने लोकांना गुप्तपणे प्रार्थना करण्यास देखिल शिकविले.



13

येशूने म्हटले की, जे कोणी देवावर भरोसा करतात त्यांना तो अन्न व वस्त्र यांचा पुरवठा करतो.



14













येशू बारा मदतनिसांची निवड करता

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

मत्तय ४-७, मार्क १, लूक ६

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे.

ईश्वर आमच्यावर इतके प्रेम करतो की क्रॉसवर मरण्यासाठी आणि आमची शिक्षा भोगण्यासाठी त्याने आपल्या पुत्राला येशूला पाठविले. येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गात परत गेला! आता ईश्वर आमच्या पापांसाठी क्षमा करू शकतो.

जर तुम्ही तुमच्या पापांपासून मुक्ती मिळवू इच्छिता, तर ईश्वराला हे सांगा: प्रिय ईश्वरा, येशू माझ्यासाठी मेला आणि आता पुन्हा जगतो आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल आणि नंतर मी कायम तुझ्याबरोबर राहीन. तुझे मूल होऊन तुझ्यासाठी जगण्यास मला मदत कर. आमेन. जॉन 3:16

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!